**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः24.07.2024** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

- 2024-25 या वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प लोकसभेत सादर; प्राप्तीकर रचनेत बदल
- कृषीक्षेत्रासाठी 1 लाख 52 हजार कोटींची तरतूद; युवावर्गासाठीही विविध योजनांची घोषणा
- आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका आणि गट प्रवर्तकांना दहा लाख रुपयांचा अपघाती विमा देण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
- राज्यात आतापर्यंत सरासरीच्या 123 टक्के पाऊस; 91 टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण

  आणि
- नीट-युजी परीक्षा रद्द करायला सर्वोच्च न्यायालयाचा नकार

**अर्थसंकल्प**

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातला पहिला केंद्रीय अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल संसदेत सादर केला. या अर्थसंकल्पात सर्वांना संधी उपलब्ध करुन देणारी नऊ प्राधान्य क्षेत्रं निश्चित करण्यात आली आहेत. यात कृषी क्षेत्राची उत्पादकता, रोजगार आणि कौशल्यविकास, सर्वसमावेशक मनुष्यबळ विकास आणि सामाजिक न्याय, उत्पादन आणि सेवा, शहरी विकास, उर्जा सुरक्षा, पायाभूत सुविधा, नवोन्मेष, संशोधन आणि विकास यासह अत्याधुनिक सुधारणा यांचा समावेश आहे. समाजातील सर्वच घटकांना प्राधान्य देणारा आणि विकसित भारताच्या

उद्दीष्टाकडे वाटचाल करण्यासाठीचा पथदर्शी आराखडा असणाऱ्या या अर्थसंकल्पाविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून,

**2024-25 या वर्षासाठीच्या या अर्थसंकल्पात कृषीक्षेत्रासाठी 1 लाख 52 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून येत्या दोन वर्षात देशभरातल्या एक कोटी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीसाठी प्रोत्साहित केलं जाणार आहे. याअंतर्गत त्यांच्या शेतमालाचं प्रमाणीकरण करुन त्याला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी सहाय्य केलं जाईल. भाजीपाला उत्पादकांसाठी बाजारपेठेजवळ मोठी गोदाम संकुलं विकसित करण्यात येतील. नवीन करप्रणालीअंतर्गत वेतनधारकांसाठी मानक वजावटीची मर्यादा वाढवून 75 हजार रुपये करण्यात आली असून निवृत्तीवेतनधारकांसाठी ती 25 हजार रुपये करण्यात आली आहे. यामुळे सुमारे 4 कोटी वेतनधारक आणि निवृत्तीवेतनधारकांना दिलासा मिळेल. प्राप्तीकराच्या रचनेतही बदल करण्यात आला असून 3 लाखांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त असेल. 3 ते 7 लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर 5 टक्के, 7 ते 10 लाखांसाठी 10 टक्के, 10 ते 12 लाखांसाठी 15 टक्के, 12 ते 15 लाखांसाठी 20 टक्के आणि 15 लाखांवरील उत्पन्नावर 30 टक्के प्राप्तीकर लागू असेल. यामुळे वेतनधारकांची प्राप्तीकरात साडेसतरा हजार रुपयांची बचत होणार आहे.**

**उद्योग क्षेत्रासाठी विविध करसवलतींची घोषणा करण्यात आली आहे. यात अतिरिक्त रोजगारनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांना कर्मचारी भविष्य निर्वाह निधीत सवलत, भारतीय स्टार्ट अप कंपन्यांमधल्या गुंतवणूकीवरचा एंजल कर रद्द करणं, विकासकामांसाठी भांडवल उभारण्यासाठी परदेशी कंपन्यांच्या भांडवली करात पाच टक्क्यांची कपात यांचा समावेश आहे. भांडवली नफ्यावरील करातही सुसूत्रता आणण्यात आली आहे. कमी मुदतीच्या गुंतवणूकीवरील नफ्यावर 20 टक्के आणि दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकीवरील नफ्यावर साडेबारा टक्के कर आकारला जाईल. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रातल्या कंपन्यांना यंत्रसामुग्री खरेदीसाठी विनातारण पतहमी योजना सुरू केली जाणार आहे. मुद्रा योजनेअंतर्गत घेतलेल्या आधीच्या कर्जाची परतफेड करणाऱ्यांना 20 लाखांपर्यंतचं कर्ज दिलं जाईल.युवावर्गाकडेही अर्थसंकल्पात विशेष लक्ष देण्यात आलं आहे. आगामी पाच वर्षांत 20 लाख युवकांना कौशल्य प्रशिक्षण दिलं जाणार आहे. भारतीय शिक्षण संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना 10 लाख रुपयांपर्यंतचं कर्जसहाय्य दिलं जाईल. येत्या 5 वर्षांत 1 कोटी युवकांना रोजगार मिळवून देण्यासाठी देशातल्या पाचशे कंपन्यांमधे सर्वंकष आंतरवासिता योजना राबवली जाईल. यामध्ये प्रशिक्षणार्थी उमेदवारांना 5 हजार रुपये आंतरवासिता भत्ता दिला जाणार आहे. ग्रामीण विकासासाठीही अर्थसंकल्पात भरीव तरतूदी आहेत. आदिवासीबहुल गावं आणि आकांक्षित जिल्ह्यांच्या विकासासाठीच्या योजनेचा 63 हजार गावांमधल्या सुमारे 5 कोटी आदिवासी नागरिकांना लाभ होईल. ग्रामीण भागातल्या पंचवीस हजार वाड्या वस्त्यांपर्यंत पोहोचणारे, सर्व प्रकारच्या हवामानात टिकून राहणारे रस्ते बांधण्यासाठी पंतप्रधान ग्रामीण रस्ते योजनेचा चौथा टप्पा सुरू करण्यात येणार आहे. पंतप्रधान आवास योजनेतून शहरी आणि ग्रामीण भागात आणखी 3 कोटी घरं बांधण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. महिलाआधारित विकासाच्या दृष्टीनं या अर्थसंकल्पात महिला आणि मुलींच्या कल्याणकारी योजनांसाठी 3 लाख कोटींपेक्षा जास्त रकमेची तरतूद करण्यात आली आहे.पर्यटन उद्योगाच्या विकासासाठी विविध मंदिर क्षेत्रांचा विकास करुन त्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचं पर्यटनस्थळ बनवण्यात येईल. अत्याधुनिक सुधारणांद्वारे रोजगाराच्या संधी निर्माण करुन विकासदराचा आलेख चढा ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल.राज्यांमधल्या निकोप स्पर्धेला प्रोत्साहन देऊन त्यांनी सुधारणांची अंमलबजावणी जलद गतीनं करावी यासाठी राज्यांना 50 वर्षांच्या मुदतीसाठी बिनव्याजी कर्ज देण्यात येणार आहे. सोनं, चांदी आणि प्लॅटिनमच्या आयातीवरील सीमाशुल्कात कपात करण्यात आली आहे. त्यामुळे देशभरात या मौल्यवान धातूंच्या किमतीत घट झाल्याचं दिसून आलं. कर्करोगावरील औषधांच्या सीमाशुल्कातही कपात करण्यात आली आहे. पूर्वोदय योजनेअंतर्गत बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा आणि आंध्र प्रदेशसह ईशान्येकडील राज्यांच्या संपूर्ण विकासासाठी**

**सरकार एक योजना आखणार आहे. त्यासाठी या राज्यांना निधी पुरवला जाणार आहे. तसंच या भागातल्या बँकिंग सेवेच्या विस्तारासाठी इंडिया पोस्ट पेमेंट बँकेच्या शंभरावर शाखा ईशान्य भारतात सुरू करण्यात येणार आहेत.या अर्थसंकल्पात वित्तीय तूट सकल देशांतर्गत उत्पादनाच्या 4 पूर्णांक 9 दशांश टक्के इतकी दर्शवण्यात आली आहे. ही तूट पुढच्या वर्षापर्यंत साडेचार टक्क्यांवर आणण्याचा सरकारचा  प्रयत्न असेल असं सांगून पायाभूत सुविधा क्षेत्राच्या विकासाला सरकार यापुढेही प्राधान्य देणार असल्याचं सीतारामन यांनी अर्थसंकल्पीय भाषणात सांगितलं. आकाशवाणी बातम्यांसाठी सुरेखा जोशी पुणे.**

## रेल्वे अर्थ संकल्प

अर्थसंकल्पात रेल्वेसाठी आतापर्यंतची सर्वाधिक म्हणजे 2 लाख 62 हजार 200 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचं सांगून रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी अर्थसंकल्पाचं स्वागत केलं आहे.

## अर्थ संकल्प प्रतिक्रिया

समाजातील सर्व घटकांच्या विकासाला प्राधान्य देणारा आणि विकसित भारताचा मार्ग प्रशस्त करणारा अर्थसंकल्प असल्याचं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अर्थसंकल्पाची प्रशंसा केली आहे. युवा पिढीसाठी नवनवीन संधी निर्माण करून देशाला उज्ज्वल भवितव्याकडे नेणारा हा अर्थसंकल्प आहे असं पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. या अर्थसंकल्पात राज्यातील विविध पायाभूत सुविधांच्या विकासासाठी सात हजार पाचशे पंचेचाळीस कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या अर्थसंकल्पाचं स्वागत केलं असून विकसित भारताच्या संकल्पनेला बळ देणारा अर्थसंकल्प असल्याचं म्हटलं आहे. फिक्की, असोचेम, सीआयआय यासारख्या उद्योग जगतातील संघटनांनीही या अर्थसंकल्पाचं स्वागत केलं आहे.

विरोधी पक्षांनी या अर्थसंकल्पावर टीका केली आहे. निराशादायक अर्थसंकल्प असं म्हणत अर्थसंकल्पात उत्पन्नातील तफावतीकडे लक्ष देण्यात आलेलं नाही असं काँग्रेसनं म्हटलं आहे.

**राज्य मंत्रिमंडळ**

राज्यातील आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका आणि गट प्रवर्तकांना अपघाती मृत्यू आल्यास दहा लाख रुपये तर अपंगत्व आल्यास पाच लाख रुपयांचं अनुदान देण्याचा निर्णय काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. यासाठी दरवर्षी अंदाजे 1 कोटी 5 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. राज्यातील मेंढपाळांसाठीची राजे यशवंतराव होळकर महामेष योजना पुढे सुरू ठेवणं, राज्य शासनातील दिव्यांग कर्मचाऱ्यांसाठी 30 जून 2016 पासून पदोन्नतीसाठी आरक्षण लागू करणं तसंच शेतपिकांचं नुकसान ठरवण्यासाठी अद्ययावत प्रणाली विकसित करण्याचा निर्णयही कालच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

**पीक पाणी**

राज्यात आतापर्यंत सरासरीच्या 123 टक्के पाऊस झाला असून पेरण्याही समाधानकारक झाल्या असल्याची माहिती कृषी विभागाने काल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिली. उसाचं क्षेत्र वगळता राज्यात खरीपाचं 1 कोटी 42 लाख 2 हजार हेक्टर क्षेत्र असून आतापर्यंत 1 कोटी 28 लाख 94 हजार लाख हेक्टर क्षेत्रावर म्हणजेच 91 टक्के क्षेत्रावर पेरणी झाली असल्याचं कृषी विभागानं नमूद केलं आहे.

**नीट**

यंदा घेतलेली नीट-युजी परीक्षा रद्द करायला सर्वोच्च न्यायालयानं नकार दिला आहे. यंत्रणेतील त्रुटीमुळे पेपर फुटले असल्याचा कुठलाही पुरावा नाही. फेरपरीक्षा घेतली तर 23 लाख विद्यार्थ्यांवर परिणाम होईल आणि शैक्षणिक वेळापत्रक विस्कळीत होईल, असं न्यायालयानं काल सांगितलं.

**पाऊस**

पुणे, सांगली आणि कोल्हापूरसह राज्याच्या विविध भागात काल मुसळधार पाऊस झाला. पुण्याला पाणीपुरवठा करणारं खडकवासला धरण 85 टक्के भरलं असून नदी पात्रात विसर्ग सुरु करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी असं आवाहन पाटबंधारे विभागानं केलं आहे. सांगली आणि कोल्हापूरमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन सतर्क झालं आहे.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्रात अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भातही वीजांसह जोरदार पावसाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**